दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..


● वर्ष १६ वे ● अंक २८४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.८ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# मुंबईत लॉकडाऊनची गरज नाही, १० दिवसांत रुग्ण कमी होतील : आयुक्त चहल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात कोरोनाची रुग्णसंख्या झपाट्यानं वाढत असताना मुंबई हे रुग्णवाढीचं केंद्रस्थान बनलं आहे. मुंबईत काल आणि आजही दैनंदिन रुग्णवाढ २० हजारांच्यावर पोहोचली आहे. यातच महापालिकेचे आयुक्त इकबाल सिंह चहल यांनी केलेल्या वक्तव्याची चर्चा सुरू झाली होती. मुंबईत दैनंदिन रुग्णवाढ २० हजारांवर पोहोचल्यास लॉकडाऊनचा विचार करावा लागेल असं विधान काही दिवसांपूर्वी चहल यांनी केलं होतं. आता मुंबईत दैनंदिन रुग्णवाढीनं २० हजारांचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे मुंबईत लॉकडाऊन लागणार का अशी चर्चा सुरू झाली आहे. यावर खुद्द इकबाल सिंह चहल यांनी आज आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

मुंबईतील सध्याची रुग्णवाढीची स्थिती पाहाता लॉकडाऊनची गरज नाही, असं आयुक्त चहल यांनी म्हटलं आहे. त्यामुळे मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबईत काल २० हजाराच्यावर रुग्णसंख्या होती. त्यापैकी फक्त ११० लोक ऑक्सिजनवर बेडवर आहेत.





११८० लोक रुग्णालयात दाखल आहेत आणि शहरात ३५ हजार बेड्सपैकी ५९९९ बेड्स व्यापलेले आहेत. म्हणजेच जवळपास ८४ टक्के बेड्स रिकामी आहेत. त्यामुळे ऑक्सिजनचा वापर देखील नगण्य आहेत. बेड रिकामी आहेत. त्यामुळ शहरात लॉकडाऊनची गरज नाही, असं चहल यांनी म्हटलं आहे.

दक्षिण आफ्रिकेत पाच आठवड्यांमध्ये लाट ओसरली. आपल्याकडे आता तिसरा आठवडा संपतो आहे. अजून पुढचे फक्त १० दिवस काढले तर मला खात्री आहे की वाढणाऱ्या केसेस कमी होतील, असा विश्वास इकबाल सिंह चहल यांनी व्यक्त केला आहे. तसंच रुग्णांचा आकडा आता महत्त्वाचा राहिलेला नसल्याचंही ते म्हणाले. रुग्णांच्या आकड्यापेक्षा आता तुमच्याकडे किती बेड्स शिल्लक आहेत. हॉस्पीटल्सची, ऑक्सिजनच्या वापराची, ऑक्सिजन बेडची काय स्थिती आहे हे महत्त्वाचं आहे. रुग्णसंख्या कमी असतानाही जर ऑक्सिजनचा किंवा आयसीयूचा वापर वाढला तर आपण निर्बंधांचा विचार करू, आता आकड्यांवर लॉकडाऊन होऊ शकत नाही, असं चहल म्हणाले.

# वाहतूक पोलिसांकडून अवैध वसुली ; हायकोर्टात जनहित याचिका दाखल

## मुंबई हायकोर्टाने दिले ठाणे, नवी मुंबई पोलिसांना उत्तर देण्याचे निर्देश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

परराज्यांतून मुंबईलगतच्या ठाणे आणि नवी मुंबई परिसरात येणाऱ्या अवजड वाहनांच्या चालकांकडून रस्ता अडवणे, रस्त्यावर पार्किंग करणे किंवा टोइंग चार्जेस अशा नावाखाली ७५० ते ८०० रुपयांची अवैध वसुली करून, वाहतूक पोलिसांकडून मोठा भ्रष्टाचार सुरू आहे, असा गंभीर आरोप जनहित याचिकेद्वारे करण्यात आला आहे. ही याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली आहे. त्यावर, आज, शुक्रवारी हायकोर्टात सुनावणी झाली. याबाबत चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्राद्वारे उत्तर दाखल करण्यात यावे, असे निर्देश हायकोर्टाने ठाणे पोलीस आयुक्त, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील उपायुक्त श्रेणीच्या अधिकाऱ्यांना दिले.

'वाहतूक पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांनी खासगी व्यक्ती व टोइंग वाहनचालकांच्या मदतीने भ्रष्टाचार करण्याची अनोखी शक्कल लढवली आहे. त्याद्वारे दरमहा ७ ते ११ कोटी रुपये कमावण्याचा मार्ग त्यांनी शोधला आहे. परराज्यांतून मुंबई परिसरात दाखल होऊन चहापाणी किंवा स्वच्छतागृहात जाण्यासाठी



थांबलेल्या अवजड वाहनांच्या चालकांकडून रस्ता अडवला, रस्त्यावर पार्किंग केले किंवा टोइंग चार्जेस अशा नावाखाली ७५० ते ८०० रुपयांना लुबाडले जाते आणि अशा अवैध वसुलीतून मिळवलेल्या कमाईचे आपसांत वाटप केले जाते', असा गंभीर आरोप करत चौकशीची मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. त्यावर आज, शुक्रवारी मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान हायकोर्टाने ठाणे पोलीस आयुक्त, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील उपायुक्त श्रेणीच्या अधिकाऱ्यांना निर्देश देत, चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्रावर उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.

# दिघी-माणगाव रस्त्याचे काँक्रीटीकरण रखडले

## वनखाते व महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाच्या बोटचेपी भूमिकेमुळे संताप



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – माणगाव – दिघी मार्गाचे काम पूर्ण होत असताना काही ठिकाणी मात्र, वन खात्याच्या परवानगी अभावी काम पूर्ण होण्यास विलंब होत असल्याचे समोर आले आहे. अर्धवट रस्त्यांमुळे जीवघेणे अपघात देखील होऊ शकतात. त्यामुळे काँक्रीटीकरण साठी वन खात्याने वन जमीन देण्याची प्रक्रिया राखडल्याने संताप व्यक्त केला जातोय.

दिघी – माणगाव रस्त्याच्या काँक्रीटीकरणचे काम हे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ करीत आहे. त्यासाठी जे एम म्हात्रे कंत्राटदार नेमले आहेत. माणगाव ते दिघी दरम्यान असलेल्या माणगाव, म्हसळा व श्रीवर्धन तालुक्यांतील वडवली, सकलप, तसेच मोरबा इत्यादी गावांतील खाजगी व वन विभागाच्या जमिनीचे अधिग्रहण होणे अद्यापही बाकी आहे. महाराष्ट्र राज्य रस्त्ये विकास महामंडळाकडून त्याबाबतचा प्रस्ताव हा वन खात्याकडे अगोदरच पाठवला आहे. मात्र शासकीय रितीरिवाजामुळे नेहमीप्रमाणे काम होण्यास विलंब होत असल्याचे समोर येत आहे. रस्त्याच्या रुंदीकरण होणे साठी वन खात्याकडून जमीन अधिग्रहण चा प्रस्ताव हा रोहा येथील उपवनसंरक्षक, नागपूर येथील वन विभाग कार्यालय, मंत्रालय व नंतर केंद्र सरकार इत्यादी कार्यालयाकडून परवानगी मिळणे अपेक्षित आहे. वन विभागाच्या कार्यालयांकडून काढण्यात आलेल्या त्रुटींबाबतची पूर्तता रस्ते विकास महामंडळाकडून करून देण्यात आली आहे. त्यामुळे वनखात्याकडून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी आता केली जात आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिघी, आदगाव, वेळास, कोंडविल आणि दिवे–आगर या नावाजलेल्या समुद्र किनारी व पर्यटन स्थळी जाण्यासाठी माणगाव वरून जावे लागते. मात्र रस्त्यांवरील अर्धवट कामांमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत

.../२

# शैक्षणिक गुणवत्ता पाहून जेएसडब्ल्यू कंपनीने स्थानिकांना कामात सामावून घ्यावे : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । पेण**

शैक्षणिक गुणवत्ता पाहून जेएसडब्ल्यू कंपनीने स्थानिक बेरोजगार व युवकांना नोकरीत सामावून घेण्याच्या सूचना खासदार सुनिल तटकरे यांनी कंपनीला केल्या. जेएसडब्ल्यू सीए–सआर फंड व डोलवी ग्राम पंचायतीच्या ग्राम निधीतून केलेल्या विविध विकास कामांचे उद्घाटन रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी व्यासपीठावर पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, तालुका अध्यक्ष दयानंद भगत, डोलवी सरपंच अनिता म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पंचायत समिती सदस्य प्रदीप म्हात्रे, वडखळ सरपंच राजेश मोकल, मलेघर सरपंच शरद पाटील, समाजसेवक अनिल म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

डोलवी ग्रामपंचायत ग्राम निधी व जेएसडब्ल्यू सीआरएस फंडातून अभयराम संन्यास आश्रमाकडे जाणाऱ्या काँक्रीट रस्त्याचे उदघाटन, कामत वाडीकडे जाणाऱ्या रस्त्याला काँक्रीट आणि रेलिंगचे उद्घाटन, आदिवासी बांधवांना खावटी वाटप, दिनदर्शिका वाटप, दत्तमंदिर भूमिपूजन आणि गाव तलाव नूतनीकरण आदी कामांचे उदघाटन रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.

यावेळी बोलताना खासदार सुनिल तटकरे यांनी कोरोना काळात जेएसडब्ल्यू कंपनीने सुरू केलेल्या संजीवनी हॉस्पिटलची स्तुती केली. मात्र कंपनीने स्थानिकांना सुध्दा त्यामध्ये कामाची संधी उपलब्ध करून देण्याची व कंपनीचा

.../२

## संक्षिप्त...

### कालीचरण महाराजांना २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुण्यात १९ डिसेंबर रोजी झालेल्या एका कार्यक्रमामध्ये कालीचरण महाराजांनी वादग्रस्त विधान केले होते. त्या प्रकरणी खडक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना रायपूर येथून अटक करण्यात आली होती. यानंतर त्यांना न्यायालयामध्ये हजर केले असता, गुरुवारी त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्यानंतर आज जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. त्यावर न्यायालयाने २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर केला आहे. कालीचरण महाराज यांच्या वादग्रस्त विधानाबाबत गुरुवारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. एस. रामदिन यांच्या न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. बचाव पक्षाकडून अमोल डांगे यांनी हा अर्ज सादर केला. त्यावर सरकार पक्षाकडून सरकारी वकील श्रीधर जावळे यांनी लेखी म्हणणे सादर केले. आरोपीचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. आरोपीला जामीन झाल्यास कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. तसेच या प्रकरणातील अन्य आरोपी फरार आहेत. कालीचरणला जामीन झाल्यास या आरोपींना मदत होईल. त्यामुळे कालीचरण याला जामीन नाकारण्यात यावा., अशी मागणी न्यायालयामध्ये करण्यात आली होती.

# वडिलांच्या आनंदाश्रूंनी गहिवरले पनवेल शहर पोलीस स्टेशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी पनवेल शहर पोलीस स्टेशनचा पदभार नुकताच स्वीकारल्या नंतर त्यांचे वडील आपल्या मुलाच्या पदोन्नती नंतर वरिष्ठ पोलीस अधिकारी झालेल्या आपल्या मुलाचे कौतूक करण्यासाठी आले होते. त्यावेळी वडिलांच्या केलेल्या कौतुकाने शहर पोलीस स्टेशन गहिवरून आले.

विजय कादबाने यांचे वडील त्रिंबक कादबाने हे शिक्षक आहेत अनेक विद्यार्थी त्यांनी घडवले वाढवले आहेत. स्वतः प्रमाणे आपल्या ही मुलावर प्रेमळ संस्कार आणि कठोरता या दोन्ही गुणांचा प्रभाव जाणवतो. अत्यंत खडतर परिस्थिती मध्ये आपले शिक्षण पूर्ण करत विजय कादबाने हे पोलीस दलात १९९६ ला रुजू झाले. मुंबई, नवी मुंबई सह पनवेल वाहतूक शाखा येथे काम पाहिले आहे. या पदोन्नती पूर्वी ते पनवेल शहराचे काम पाहत असल्याने त्याना पनवेल शहराची तंतो तंत माहिती आहे. मुळात आगामी काळात पनवेल महानगरपालिका निवडणूक, विमानतळ नामकरण यावरून होत असलेली आंदोलने, बी जे पी आणी महाविकास आघाडी यांच्यातील तणाव कमी करणे आणि पनवेल शहराच्या मुख्य बाजारपेठ असणाऱ्या भागात नागरी समाधान ही प्रमुख आवाहने आहेत. परंतु मागील त्यांचा कामाचा आलेख पाहता आणी पनवेल शहराच्या संपूर्ण माहिती पाहता ही आव्हाने त्यांच्या साठी नवी नाहीत. जुना अनुभव लोकांशी असणारी जवळीकता ह्या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत जुना अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. अशा ह्या विकसित होत असणाऱ्या नवीन शहराच्या मुख्य पोलीस स्टेशनची जबाबदारी आता विजय कादबाने यांच्याकडे आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून बढती मिळल्या नंतर अनेक मान्यवर, पत्रकार, व्यवसाईक, व राजकीय मंडळीनी शहर पोलीस स्टेशनचे कादबाने यांना आपल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यात



खास बाब म्हणून आपल्या मुलाला नोकरीत बढती मिळाली म्हणून त्यांचे

.../२

# ...तर महापालिका कर्मचाऱ्यांवरही कारवाई करा

## पनवेलमधील वकीलांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**


न्यायालयात जावून कारवाई केली म्हणून नाराज झालेल्या वकीलांनी पनवेल महापालिकेच्या कारवाईवर नाराजी व्यक्त केली आहे. काही वकीलांनी महापालिकेच्या मुख्यालयात जावून कर्मचारी मास्क घालत नसल्याचा प्रकार वरिष्ठांपर्यंत पोहोचविला. वकीलांवर कारवाई करता, तुम्ही मास्क घालता का? असा सवाल वकीलांनी केला आहे.

मंगळवारी पनवेल पालिकेच्या पथकाने पनवेलमधील न्यायालयात जावून मास्क न घालणाऱ्या नागरिकांवर कारवाई केली. यावेळी अनेक वकीलही मास्क घालत नसल्याचे समोर आले. पथकाने प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड वसूल केला. मात्र न्यायालयात येवून कारवाई करता, तुमचे कर्मचारी मास्क घालतात का? असा प्रश्न काही वकीलांनी पालिकेच्या इमारतीत जावून विचारला. यामध्ये वकील संतोष खांडेकर, भास्कर पाटील, अभिनय म्हात्रे आदींचा समावेश होता. मास्क न घालणाऱ्या कर्मचाऱ्यांची छायाचित्रे काढण्यात आली. पालिकेच्या मुख्यालयात मास्क घातला जात नाही आणि न्यायालयात येवून पालिकेचे पथक कारवाई करते, हा प्रकार चुकीचा असल्याचे मत त्यांनी मांडले. यावेळी अतिरिक्त आयुक्तांना निवेदन देवून हा प्रकार चुकीचा असल्याचे वकीलांनी सांगितले.

# पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत कचऱ्याचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील उरण नगर परिषदेच्या मुख्य गेट जवळ असलेले व एन आय हायस्कुल शाळेसमोर असलेले बापूशेठ वाडी येथील गार्डन व्हू सोसायटीच्या पाणी पिण्याच्या विहिरीमध्ये परिसरातील काही व्यक्ती आपल्या घरातील कचरा, अन्न पदार्थ टाकत असल्याने या विहिरीमध्ये कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. कचऱ्यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता खराब होत आहे.



सदर विहिरीत नागरिक कचरा टाकत असल्याने पाण्याला दुर्गंधी येण्याची व पिण्याचे पाणी खराब होण्याची शक्यता आहे. संपूर्ण भारतात केंद्र व राज्य शासन हे स्वछता विषयक जनजागृती करत आहेत तरी अजूनही काही व्यक्तींच्या विचारात, व्यक्तींच्या मानसिकतेत बदल

.../२

# आ.बाळाराम पाटील यांनी जाणून घेतल्या शिक्षकांच्या समस्या

## महाड, पोलादपूर, म्हसळा व श्रीवर्धनमध्ये घेतल्या सभा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेच्या वतीने महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन येथे शिक्षक सहविचार सभा आमदार बाळाराम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती.

आमदार बाळाराम पाटील यांनी सर्व शिक्षक बांधवांच्या समस्या ऐकून त्या कोणत्या पद्धतीने सोडविता येतील यासंदर्भात माहितीपर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद शिक्षण विभागामध्ये जो



कथित भ्रष्टाचार चालू आहे तो लवकरात लवकर मोडीत काढू असे आश्वासित केले तसेच संघटनेद्वारे विविध प्रलंबित विषय एकत्रित पणे मार्गी लावू असे आश्वासन यावेळी दिले.

या सहविचार सभा दरम्यान ज्या तालुक्यांत शिक्षक संवाद सभा झाली तिथे आमदार निधीतून

.../२

# सुरक्षेचेही राजकारण

ज्या देशाचे एक पंतप्रधान आणि एक माजी पंतप्रधान दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावले आहेत, त्या देशात 'पंतप्रधानांची सुरक्षा' हा विषय राष्ट्रीय महत्त्वाचा न ठरता पक्षीय चर्चेचा, आरोप-प्रत्यारोपांचा व्हावा, याइतकी दुर्दैवी गोष्ट दुसरी नसेल. पंजाबमध्ये १९८४ मध्ये लष्करी कारवाई झाल्यानंतर तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला आणि त्यांच्या अंगरक्षकांच्या तुकड्या बदलण्याची शिफारस करण्यात आली. ती स्वत: इंदिरा गांधी यांनी अमान्य केली. त्यांचा हा विश्वास सार्थ ठरला नाही. पुढे राजीव गांधी यांच्या जिवाला धोका असल्याने त्यांनी शुभेच्छा स्वीकारण्यासाठी सामान्य नागरिकांच्या जवळ जाऊ नये, अशा स्पष्ट सूचना होत्या. त्या राजीव गांधी मानत नव्हते. श्रीपेरुम्बुदुर या तमिळनाडूतील गावात १९९१मध्ये हारतुरे स्वीकारताना काय घडले, ते साऱ्यांना माहीत आहे. या दोन्ही शोकांतिकांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताफ्याला १५ ते २० मिनिटे पुढे जाताच येऊ नये आणि सगळ्या गाड्या पंजाबात एका फ्लायओव्हरवर खोळंबून पडाव्यात, ही घटना किरकोळ, परस्परांवर नेहेमीसारखे शिवराळ तोंडसुख घेण्याची नाही. सर्वपक्षीय नेते व त्यांच्या चेल्यांनी मात्र सारासार विवेक आणि संयम यांना पुरती सोडचिठ्ठी दिली आहे. त्यामुळे, पंतप्रधानांच्या सुरक्षा यंत्रणेत नेमकी त्रुटी कुठे आणि कशी राहिली, यावर चर्चा होण्याऐवजी 'हा पंजाब सरकारचा डाव होता' येथपासून 'सभेला गर्दी नाही, हे लक्षात येताच पंतप्रधान मागे फिरले' येथपर्यंत अकलेचे तारे तोडले जात आहेत. पंतप्रधानांचा ताफा अडकला आहे आणि पुढे काही मीटर अंतरावर मोठा जमाव आहे हे लक्षात येताच, 'स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप'चे जवान आणि अधिकारी यांच्यावर पंतप्रधान मागे फिरून सुखरूप विमानतळावर जाईपर्यंत किती ताण आला असेल, याची कल्पनाही करणे अशक्य आहे. एसपीजी हे सुरक्षादल एका खास कायद्याने तयार केले आहे. त्या कायद्यात राज्यांच्या आणि स्थानिक पोलिसांच्या जबाबदाऱ्या काय असाव्यात, याचा स्पष्ट निर्देश आहे. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यावर पश्चिम बंगालमध्ये हल्ल्याचा प्रयत्न झाला, तेव्हा या कायद्यातील तरतुदीनुसार केंद्र सरकारने बंगालमधील आयपीएस अधिकाऱ्यांना चौकशीसाठी पाचारण केले होते; मात्र सरकारने त्यांना पाठवले नाही. आता पंजाबमधील या प्रकाराची केंद्रीय गृह खाते, पंजाब सरकार आणि सगळ्या सुरक्षा यंत्रणा आपापल्या पातळीवर चौकशी करीत आहेत. पंजाब सरकारने बंगाल सरकारसारखेच वर्तन केले, तर ती फार मोठी चूक ठरेल. हा कोणत्याही व्यक्तीचा किंवा एखाद्या पक्षाच्या नेत्याचा प्रश्नच नाही, हे गांभीर्य जसे पंजाबचे मुख्यमंत्री किंवा काँग्रेस प्रवक्त्यांच्या प्रतिक्रियांमध्ये दिसत नाही; तसेच ते बेछूट आरोप करीत सुटलेल्या भारतीय जनता पक्षाच्या काही नेत्यांच्याही वक्तव्यांत आढळत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मी भटिंडा विमानतळावर जिवंत परतलो आहे, असा निरोप मुख्यमंत्र्यांना सांगा,' असे उद्गार पंजाब सरकारच्या अधिकाऱ्यांसमोर काढले. मोदींच्या आसपास सुरक्षा अधिकाऱ्यांची जी धावपळ आणि घालमेल चालू होती, त्यातून त्यांनाही परिस्थितीचे गांभीर्य जाणवले असणार. यातून त्यांनी वरील उद्गार काढले असतील, तर त्यावर 'नौटंकी' वगैरे हीणकस शब्दांत टीका करण्याऐवजी, अशी वेळच का आली असेल, याचा विचार व्हायला हवा. पंतप्रधान मोदींचा रस्ता अडवून धरलेल्या शेतकऱ्यांच्या एका नेत्याने 'पोलिस अधिकाऱ्यांनी रस्ता मोकळा करायला सांगितले आणि पंतप्रधान या रस्त्याने जातील असेही सांगितले; पण आपल्याला ती थापेबाजी वाटली,' असे हास्यास्पद ट्वीट केले आहे. पंतप्रधान जाणार असलेला रस्ता मोकळा करण्यात पंजाब पोलिसांना अपयश का आले आणि पंतप्रधानांनी ऐनवेळी हेलिकॉप्टरऐवजी गाडीने येण्याचे ठरविलेले आंदोलकांना समजले कसे, या प्रश्नांची उत्तरे चौकशीत मिळावीत. शेतकऱ्यांच्या आंदोलनात इंदिरा गांधी यांचा संदर्भ देऊन काही घोषणा दिल्या जात होत्या. त्या घोषणांचा आणि मोदींची वाट अडविण्याचा काही संबंध होता का, याचाही योग्य तपास व्हावा. पंजाबची विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे. तेथे प्रचंड राजकीय घुसळण चालू आहे. त्यातच, शेतकऱ्यांच्या नुकत्याच संपलेल्या 'यशस्वी आंदोलना'चे भारलेले वातावरण आहे. अशा वेळी, अशा घटना घडतात, तेव्हा त्यांना पक्षीय व प्रचारी रंग येऊ नये, याची काळजी सर्व पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी घ्यायची असते. ती घेतली नाही, तर प्रशासन आणि इतर यंत्रणांचे राजकियीकरण होते. पंजाबमधल्या घटनेचा तोही एक इशारा आहे. पक्षीय अभिनिवेश दूर ठेवून, अशा धोक्यांचा गंभीर विचार करण्याएवढी सुबुद्धी सर्वच राजकीय पक्षांना या निमित्ताने आली तर बरे होईल.

# खोपोली नगर परिषदेत 'नो व्हॅक्सीन, नो एंट्री

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषदेचा कारभार अफलातून असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. कोरोनाचा कहर वाढत असल्याने खोपोली नगर परिषद हद्दीत कठोर निर्बंध लावण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. त्यानुसार खोपोली नगर परिषद इमारतीत दोन व्हॅक्सीन असलेल्यांनाच शिरकाव करण्यास परवानगी देण्यात येत असली तरी त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती असलेले फलक (बॅनर) नगर परिषद इमारतीच्या आजूबाजूला लावण्यात आलेले नाही.

व्हॅक्सीनेशन झाले आहे की नाही हे पाहण्यासाठी एका तरूणाला प्रवेशद्वारावर उभे करण्यात आले असून फक्त तोंडी कारभार सुरू असल्याचे दिसून येत आहे. याचप्रमाणे खोपोली नगर परिषद इमारतीतील सैनिटाइजर मशीन देखील बंद आहेत. मुख्याधिकारी यांच्या केबीनच्या बाहेर असलेले सॅनिटाइजर मशीनही बंद असल्याने नेमके कोणत्या नियमांची अमंलबजावणी खोपोली नगर परिषदेत होत आहे, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

# युवकाने सीपीआर देऊन वाचविले मुस्लिम युवकाचे प्राण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डॉक्टरांना आपण देव मानतो कारण जात धर्म वर्ण न बघता ते रुग्णांना मृत्यूच्या दारातून परत आणतात परंतु माणूस जेव्हा ठणठणीत बरा होतो तो पुन्हा जात धर्म वर्ण भेदाच्या फेऱ्यात गुरफटतो. पंरतु खारघर नवी मुंबई इथे घडलेल्या एका घटनेने याला छेद दिला आहे. सचिन साळुंखे हे खारघर स्वप्नपूर्ती यथे राहत असून ते तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरमध्ये बिलिंग विभागात कार्यरत आहेत. स्वप्नपूर्ती इथे २५ डिसेंबरला मॉर्निंग वॉक करीत असताना अचानक एक इसम कोलमडून खाली पडला,आजूबाजूला जास्त नागरिक नसल्यामुळे त्याची दखल कोणी घेतली नाही परंतु तळमजल्यावर राहत असलेले सचिन साळुंखे हे त्या व्यक्तीच्या मदतीला धावून आले व त्यांनी तात्काळ सीपीआर देऊन त्यांचे प्राण वाचविले. सीपीआर दिल्यानंतर तो इसम थोडा शुद्धीवर आला. लगेच त्याच्या मोबाइलवरून घरच्या मंडळींना कळविण्यात आले व पुढील तपासणीसाठी सायन हॉस्पिटलमध्ये त्याला दाखल करण्यात आले. व त्या व्यक्तीचे नाव होते जफर रसूल खान आता जफर हे पुन्हा घरी आले असून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार घेत असून त्यांना फिट आली होती.

जाफर हे वयाने तरुण असून ते एकमेव कुटुंबातील कमावते व्यक्ती आहेत. याविषयी बोलताना सचिन साळुंखे म्हणाले तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरमध्ये आम्हाला नियमित सीपीआर चे प्रशिक्षण दिले जाते व त्याचा फायदा मला या नागरिकाचा जीव वाचविण्यासाठी झाला. सीपीआर हा रुग्ण किंवा जखमी व्यक्तीचा जीव वाचवण्याचा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. यामध्ये हृदयविकार आणि श्वास लागणे यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीचे प्राण वाचू शकतात. सीपीआर देण्यापूर्वी तुम्हाला त्यासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. आज मला जर सीपीआर येत नसते तर कदाचित मी त्याला मदत करू शकलो नसतो. मधुमेह ,उच्चरक्तदाब ,फास्टफूड खाद्य संस्कृतीची क्रेझ ,मानसिक ताणतणाव आदी कारणांमुळे हृदयविकाराचे रुग्ण वाढत आहे. हृदयविकार झालेल्या अनेक रुग्णांना आपल्याला हृदयविकार आहे याचीच जाणीव नसते. त्यामुळे कधीकधी अचानक रस्त्यामध्ये हार्ट अटॅक येणे, प्रवासामध्ये चक्कर येणे अथवा अचानक हृदय प्रक्रिया बंद पडणे, असे प्रकार घडतात. अशावेळी आजूबाजूला असलेल्या नागरिकांना नक्की काय उपचार करावे? याची माहिती नसते आणि त्यामुळे रुग्णाला हॉस्पिटलमध्ये पोहचवण्याआधीच तो मरण पावतो. अशावेळी हे सीपीआर प्रशिक्षण खूप उपयोगी पडते अशी माहिती तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरचे जेष्ठ डीजीएम संतोष साईल यांनी दिली. तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल दरवर्षी शेकडो नागरिकांना सीपीआरचे प्रशिक्षण मोफत देतात.


मे.पांडे साहेब यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
अॅड.शशिकांत द. ढवळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.१४००/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०२/२०२२

श्री.सनी बाबुराव शेळके
वय : २८ वर्षे, धंदा : शेती
मु.पो.आदई, माथेरान रोड, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक / निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी,
ग्रुप ग्रामपंचायत आदई — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची आई कै.सरिता बाबुराव शेळके हिचा मृत्यू मौजे : मु.पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी दि.२०/१२/१९९७ रोजी झालेला असून त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आदई आणि पंचायत समिती पनवेल व इतर संबंधित यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. त्या कारणाने अर्जदार यांनी मे.न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तसेच कै.सरिता बाबुराव शेळके यांच्या मृत्यूचा दाखला देण्याबाबत ज्या कुणाच्या हरकती असतील त्या हरकती नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात, तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.०७/०१/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



**जाहीर नोटीस**

आमचे अशिल श्री.रामसुभाष चौहान रा. रुम नं.१०१, अनंत कॉर्नर को.ओ.हौ.सो., प्लॉट नं.१४९, नावडे रेल्वे स्टेशन समोर, नावडे कॉलनी, तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड यांनी खालील मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे मान्य केले आहे. खालील वर्णनाची मिळकत शमसुददोहा इस्लाम खान यांच्या ताबेकब्जात असल्याने त्यांचेकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| वावंजे, तालुका : पनवेल, जि.रायगड | ७९ | २ | ०-१८-५० पैकी ०-०२-०० |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : ०७/०१/२०२२

**सही/-**
**अॅड.शशिकांत काळु म्हात्रे**
**ग्राऊंड फ्लोअर, दत्ताचार्य अपार्टमेंट,**
**पायोनिअर सोसायटी, स्वामी नित्यानंद रोड,**
**युविका हॉटेल जवळ, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९९२०३८४४२४**



मे.पांडे साहेब कोर्ट
अर्जदारतर्फे वकील : अॅड.सौ.रश्मी बळीराम जाधव

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.चौ.अर्ज नं.१३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०२/२०२२

श्री.वासुदेव बाळकृष्ण पाटील
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
रा.कसळखंड, पो.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपचांयत कसळखंड,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची पत्नी कै.हिराबाई वासुदेव पाटील यांचा मृत्यू दि.११/०९/१९९६ रोजी मु.कसळखंड, पो.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झाला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत कसळखंड कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील चौकशी अर्ज अर्जदार यांनी मयत कै.हिराबाई वासुदेव पाटील यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केला आहे.

सबब, सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास, सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.कोर्टात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०७/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**


# नगरपंचायतीच्या दिशेने झेपावणाऱ्या पालीत घाण व कचऱ्याची समस्या गंभीर; घंटागाड्या असूनही कचरा रस्त्यावर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या तसेच नगरपंचायतीच्या दिशेने वाटचाल होत असलेल्या पालीत कच-याची समस्या गंभीर झाली आहे. वर्षानुवर्षे कचऱ्याची समस्या अधिक गंभीर बनतेय. शहरात नगरपंचायतीच्या घंटागाड्या फिरून देखील काही नागरीक फुटक्या कचरा कुंड्या आणि रस्त्यावर कचरा टाकत आहेत. परिणामी घाण आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यावर येणारा कचरा नागरिकांच्या आरोग्यास अपायकारक ठरत आहे, तर कचरा कुंड्यात काही खाद्य मिळेल यासाठी गुरे कचऱ्यातील प्लास्टिक पिशव्या खात आहेत, परिणामी गुरांच्या जीवितास ही धोका निर्माण झालाय. सांडपाण्याचा निचरा देखील योग्य पद्धतीने होत नसल्याची ओरड नागरिक करीत आहेत.

पालीतील कचरा समस्येवर मात करण्यासाठी तत्कालीन ग्रामपंचायतीतर्फे ४ वर्षांपूर्वी घंटा गाड्या सुरू करण्यात आल्या होत्या. सध्या नगरपंचायतीकडे ४ घंटागाड्या कार्यरत आहेत. या घंटा गाड्या येथील विविध भागात फिरून कचरा गोळा करतात. आठवड्यातून रविवारीच फक्त घंटा गाड्या येत नाहीत. त्यानंतर सोमवारी अनेक ठिकाणच्या कचरा कुंड्या व रस्त्याच्या कडेला कचऱ्याचा ढीग पडलेला असतो.

तर इतर दिवशी देखील हीच परिस्थिती पहायला मिळते. घंटागाडी कचरा घेऊन गेल्यानंतर झालेला कचरा काही दुकानदार तसेच अनेक जण घरात किंवा सोयटीमध्ये साठवून न ठेवता लागलीच कचरा कुंड्यांमध्ये व रस्त्यावर टाकतात. तर काहीजण दिवसभर घरी नसल्यास जमा झालेला कचरा आजूबाजूच्या कचरा कुंड्यांमध्ये किंवा रस्त्यावर टाकून देतात. परिणामी कचऱ्याची समस्या जैसे थेच राहते. यामुळे नागरिकांसह भाविकांचे आरोग्य देखिल धोक्यात आले आहे. भटके कुत्रे व जनावरे हा कचरा अस्ताव्यस्त करतात. तसेच गुरे-ढोरे व भटके कुत्रे यातून अन्न शोधण्यासाठी जातात आणि हा सर्व कचरा व घाण रस्त्यावर व बाजुच्या गटारात पडते. आणि गटारे तुंबून आणखी समस्या उद्भवते.

पाली नगरपंचायतीकडे अधिकृत १५ ते १८ सफाई कर्मचारी आहेत. मात्र तुटपूंजा पगार व सेवासुविधांचा अभाव यामुळे प्रत्यक्षात जेमतेम ९-१० कर्मचारी रोज कामावर येतात. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण येतो. परिणामी सर्वच ठिकाणची साफसफाई करणे त्यांना शक्य होत नाही. सध्या कचरा उचलण्यासाठी एक ट्रॅक्टर व दोन छोटा हत्ती घंटा गाड्या व एक ऍपे आहेत. यातील एक घंटागाडी छोटी व बंदिस्थ आहे. त्यामुळे तिच्यात अधिक कचरा सामावत नाही. तसेच पालीचा विस्तार वाढत असल्याने अधिकच्या घंटागाड्यांची आवश्यकता आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शैक्षणिक गुणवत्ता पाहून जेएसडब्ल्यू कंपनीने स्थानिकांना कामात सामावून घ्यावे

वाढता कारभार पाहता येथील स्थानिक युवकांची शैक्षणिक गुणवत्ता पाहून त्यांना नोकरीत सामावून घेण्याच्या सूचना केल्या. राज्यासह संपूर्ण जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या विकास कामाचा झंझावात जोरात सुरू असून आमच्या कार्यक्रमाची माहिती विरोधकांना लागली की आमच्या आधीच तिथे उद्घाटन व भूमिपूजन करतात. त्यामुळे मी पेण मध्ये आल्यावरच झोपलेले जागे होतात अशी जहरी टीका खासदार सुनिल तटकरे यांनी केली.

## दिघी-माणगाव रस्त्याचे काँक्रीटीकरण रखडले

आहे. पुणे - मुळशी - माणगाव - दिघी हा मार्ग आता राष्ट्रीय महामार्ग क्र ७५३F बनला आहे.

म्हसळा बायपास च्या दीड किलोमीटर साठी जमिनीचे अधिग्रहण झालेले नाही. त्यामुळे उर्वरित कामे पूर्ण होत नाही असे जे एम म्हात्रे यांनी सांगितले. वडवली फाटा येथील साधारण १०० मीटरच रस्ता गेली २वर्षे रखडला आहे. श्रीवर्धन चे वनक्षेत्रपाल मिलिंद राऊत यांनी सांगितले की आरक्षित वन जागेच्या वापराबाबत ची काही फी भरणे आवश्यक असते मात्र ती न भरल्याने काम रखडले आहे. तर कंत्राटदाराने ती सर्व फी भरली असून पुढील कार्यवाही रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी करणे अपेक्षित असते मात्र एमएसआरडीसी याचा कोणताच पाठपुरावा करत नाही परिणामी रस्ता तसाच रखडला आहे. माणगाव - दिघी महामार्गावरील सकलप येथी म्हसळा बायपास हा रोड जमीम अधिग्रहण मुळे रखडला आहे. संबंधित विभाग हे जमीन अधिग्रहण करून देत नाही त्यामुळे कंत्राटदार देखील वैतागला आहे किंबहुना काम सोडून देण्याची भूमिका असल्याचे ऐकण्यात आले आहे.

## वडिलांच्या आनंदाश्रूंनी गहिवरले पनवेल शहर पोलीस स्टेशन

वडील त्रिंबक कादबाने याना ही आनंद झाल्याने त्यांनी तडक गावावरून निघत पनवेल शहर पोलीस स्टेशन गाठले. आपल्या पोलीस अधिकारी झालेल्या मुलाचा हार पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले. कष्टाचे चीझ झाले असा आदर भाव वडिलांच्या चेहऱ्यावर जाणवत होते. लोकांची सेवा करा असा आशीर्वाद देताच उपस्थिती असणाऱ्या पोलीस स्टेशन मधील सहकार्यनसह वातवरण काहीस भारावून गेले. वडिलांनी आपल्या मुलाचा असा आदरयुक्त सत्कार करावा ही वेळ फार कमी मुलांच्या नशिबाला येते.असे आदरयुक्त वडील असतील. तर नवी पिढी या घडलेल्या गोष्टींचा आदर नक्की घेईल.आणि असे अनेक कर्तृत्ववान अधिकारी देशसेवेत येतील. वरिष्ठ पोलीस निरीक्षक झालेल्या मुलाच्या गळ्यात स्वागताचा हार घालताना हा क्षण पाहणाऱ्याच्या डोळ्याच्या कडा पाणवल्या होत्या. गहिवरलेले मन आणि काही वेळाची शांतता काही वेळानंतर आनंदाश्रूंनी डबडबून गेली होती.

लोकांच्या साठी यश अपयश हे नेहमी पाठशिवानी चा खेळ खेळत असते.पण यशस्वी होऊन स्वतःच्या वडिलांनी आपल्या मुलाचा हा कौतुक सोहळा करावा या पेक्षा एखाद्या मुलाला काय हवंय.आईच्या अभिननंदनासाठी आलेल्या फोन ने कादबाने यांच्या भावनांचा उर भरून आला होता.काळजी घे लोकांची सेवा कर हे आई चे शब्द आपुन अजून ही लहानच आहोत याची प्रचिती करून गेले होते.

## पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत कचऱ्याचे साम्राज्य

होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. ही दुर्दैवाची बाब आहे. सदर विहिरीत कोणी घरातील अन्न पदार्थ, घरातील कचरा एखादी व्यक्ती टाकत असेल किंवा असे कृत्य करताना आढळून आल्यास त्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहिती पर्यावरण प्रेमी तथा सामाजिक कार्यकर्ते गणेश पाटील यांनी दिली आहे.

## आ.बाळाराम पाटील यांनी जाणून घेतल्या शिक्षकांच्या समस्या

शाळांना लाभ मिळाला आहे की नाही याची माहिती त्यांनी घेतली असता जवळपास सर्व शाळांनी आभार मानत आपल्या आमदार निधीतून दरवर्षी आम्हांस शैक्षणिक साहित्य मिळते अशी पुष्टी दिली. शिक्षकवर्गाकडून भरभरून मिळणारा हा प्रतिसाद निश्चितच प्रोत्साहन देणारा आहे. जिल्ह्यातील महाड पोलादपूर म्हसळा व श्रीवर्धन तालुक्यात आमदार बाळाराम पाटील यांनी शिक्षक सहविचार सभेत तालुक्यातील शिक्षकांच्या विविध समस्या जाणून घेतल्याने त्या लवकरच मार्गी लागतील. असा विश्वास शिक्षक वर्गातून व्यक्त केला जात आहे.


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(02145) 222167

**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ७८ सन २०२१-२०२२**

खालील कामांसाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.महाड, जिल्हा : रायगड पिन कोड नं.४०२३०१ दूरध्वनी क्रमांक (०२१४५) २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना www. mahapwd.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन फॉर्म फी भरुन, डाऊनलोड करुन दि.१०/०१/२०२२ पासून ते दिनांक १७/०१/२०२२ रोजी दुपारी १८.०० वाजेपर्यंत खरेदी करावयाचे आहेत. भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दि.१८/०१/०२२ रोजी ११.०० वाजता कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, महाड यांचे कार्यालयात ऑफलाईन उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | ई-निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दमखाडी ता.रोहा येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका : रोहा, जिल्हा : रायगड (आ.स्था.वि.) | ८८६७५७ | ९००० | ३ महिने | ६००/- |
| २ | पोलादपूर देवपूर गोळेगणी कुडपन रस्ता प्र.जि.मा. ७१ कि.मी.०/०० ते २८/०० (४/५०० ते ७/००) तालुका : पोलादपूर, जिल्हा : रायगड | ८०८७९४ | ९००० | ३ महिने | ३००/- |

टिप :- १) तपशिलवार निविदा सूचना कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल.
२) कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

जाक्र.मवि/लेशा/निविदा/९७
दिनांक : ०६/०१/२०२२

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# नागरिकांच्या आरोग्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन अहोरात्र सज्ज

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात गेल्या काही दिवसात करोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. दिवसेंदिवस रुग्ण संख्येत वाढ होत असल्याने परिस्थिती चिंताजनक बनत चालली आहे. रायगड जिल्ह्यातील दि.६ जानेवारी २०२२ च्या कोविड अहवालानुसार जिल्ह्यात या एकाच दिवशी तब्बल १ हजार ९६ रुग्णांची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आज दि.७ जानेवारी २०२२ रोजी जिल्ह्यातील लसीकरण व कोविड-१९ उपाययोजना व त्याविषयीची पूर्वतयारी याबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा बैठक घेतली.




या बैठकीस अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुहास माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के-पाटील, तहसिलदार विशाल दौंडकर, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी जिल्हा प्रशासनातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना कोविड केअर सेंटर सुसज्ज ठेवावेत, प्रत्येक तहसील कार्यालयात कंट्रोल रूम तयार करावा, नागरिकांना योग्य मार्गदर्शन करावे, कोविड चाचणी आणि कॉन्टॅक्ट ट्रेसिंग यावर भर द्यावा, हाय रिस्क कॉन्टॅक्टची तात्काळ कोविड चाचणी करावी, ज्याच्यामुळे संसर्ग वाढू शकतो त्यांना तात्काळ शोधून आवश्यकता असल्यास त्यांच्यावर योग्य उपचार सुरू करावेत, गृह विलगीकरणातील रुग्णांना फोनद्वारे संपर्क करावेत, त्यांना घरातच राहण्यासाठी आवाहन करावे, कोविड-१९ अनुरूप वर्तनाचे पालन काटेकोरपणे होईल, याबाबत दक्ष राहावे, कॉल सेंटर सुरू करावे, या कॉल सेंटरद्वारे नागरिकांना कोविड चाचणी कुठे करायची आहे, तब्येत खालावल्यास कुठे संपर्क करायचा, म्बुलन्सची माहिती, ऑक्सिजन हवा असेल तर कोणाला संपर्क करायचा, इतर आवश्यक वैद्यकीय मदत व मार्गदर्शन, बेडची उपलब्धता याची माहितीही नागरिकांना त्या त्या कंट्रोल रूमद्वारे देण्यात यावी, कोविड अनुरूप वर्तनाबाबत आवश्यक जनजागृती नियमितपणे करावी, ऑक्सिजन स्टोरेज युनिट व ऑक्सिजन प्लांटची वारंवार तपासणी करावी, ऑक्सिजन गळती होऊ नये, याबाबत प्राधान्याने खबरदारी घ्यावी, ऑक्सिजन चा साठा वाहून नेण्यासाठीची यंत्रणा सज्ज ठेवावी, फायर ऑडिट च्या दृष्टीने खात्री करावी, कोविड केअर सेंटर मधील स्ट्रक्चरल, इलेक्ट्रीकल अशा सर्व प्रकारच्या यंत्रणा व्यवस्थित असल्याची खात्री करावी, अग्निशमन यंत्र कार्यान्वित असल्याबाबतची खात्री करावी, हे अग्निशमन यंत्र योग्य ठिकाणी दर्शनी भागात, पटकन हाताशी लागतील, या पद्धतीने ठेवावेत, नागरिकांच्या अँटीजेन चाचणी, आवश्यकता भासल्यास आरटीपीसीआर चाचणी, कॉन्टॅक्ट ट्रेसिंग, गृह विलगीकरण, गरज लागल्यास संबंधितास कोविड केअर सेंटर मध्ये पाठविणे, त्यापुढेही गरज लागल्यास तात्काळ योग्य वैद्यकीय उपचार याबाबत नागरिकांना जागरूक ठेवावे, खेळांच्या स्पर्धा, लहान-मोठे लग्न समारंभ, इतर कार्यक्रम रद्द करावेत, लसीकरणावर भर द्यावा, कंट्रोल रूम मध्ये डॉक्टर, समुपदेशक यांची उपलब्धता ठेवावी, गृह विलगीकरणामध्ये असणाऱ्या नागरिकांशी सतत संपर्कात राहावे, त्यांची विचारपूस करावी, त्यांना काय हवे नको ते याबाबत काळजी घ्यावी, सर्व यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवावा, गरज असेल त्या ठिकाणी मॉक ड्रिल घ्यावेत, जास्तीत जास्त नागरिकांच्या कोविड तपासण्या कराव्यात, नियमांचे पालन न करणाऱ्या नागरिकांवर तातडीने दंडात्मक कारवाई करावी, कोणत्याही प्रकारे बेसावध राहू नये, अशा प्रकारच्या सविस्तर सूचना दिल्या. शेवटी प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याचे रक्षण करणे, प्रत्येक गरजू नागरिकाला वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे, ही प्रशासन म्हणून आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, हे लक्षात घेवून सर्वांनी नेमून दिलेली जबाबदारी योग्य रितीने पार पाडावी याशिवाय मास्क वापरणे, सॅनिटायझरचा वापर करणे, हात वारंवार स्वच्छ धुणे, सोशल डिस्टन्सिंग पाळणे व कोविड प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस पूर्ण करणे, या सूचनांचे पालन करण्याचे सर्व नागरिकांना वारंवार आवाहन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

# संक्षिप्त...

## मास्क व लसीकरणाचे प्रमाणपत्र नसल्यास शासकीय कार्यालयात प्रवेश नाही : तहसीलदार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

ओमीक्रोनचा वाढता प्रभाव व वेगाने वाढणारी रुग्णसंख्या या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार पालकमंत्री आणी जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली कोरोना प्रतिबंधक उपाय योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार समीर घारे यांनी दिली.

आशासेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी यांचा समवेत तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व वाडी अध्यक्ष यांचा बैठका घेऊन पहिला डोस १००% पूर्ण करणे व दुसऱ्या डोससाठी पात्र असणाऱ्या नागरिकांचे लसीकरण पूर्ण करण्याचा सूचना देण्यात आल्याचे तहसीलदार घारे यांनी सांगितले. गावातील सर्व नागरिकांची लसीकरण पूर्ण करून घेण्याची जबाबदारी ग्रामसुरक्षा दलावर सोपविण्यात आलेली आहे.

परदेशातून व परराज्यातून येणाऱ्या नागरिकांची चाचणी करून त्यांच्यावर १५ दिवस लक्ष ठेवण्याचा सुचना देण्यात आलेल्या आहेत.वाढती रुग्णसंख्या लक्षात घेऊन म्हसळा तालुक्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरवटने येथे कोरोना केअर सेंटर स्थापित करण्यात येत असून त्या ठिकाणी बेड, औषधे इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. मास्क व लसीकरणाचे प्रमाणपत्र नसल्यास कोणालाही शासकीय कार्यलयात प्रवेश दिला देण्यात येणार नाही.तसेच केंद्रशासनाच्या निर्देशानुसार वयवर्ष १५ ते १८वयोगटातील मुलांचे लसीकरण करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.त्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक, प्राचार्य व वर्गशिक्षक यांची राहील.अशी माहीती तहसीलदार घारे यांनी दिली आहे.

## बोकडविरा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शेखर पाटील



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील बोकडविरा ग्रामपंचायतची उपसरपंच पदाची निवडणूक पार पडली असून या ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी ग्रामपंचायत सदस्य, गाव हक्क संघटना पॅनलचे उमेदवार शेखर भास्कर पाटील यांची निवड झाली आहे. ९ ग्रामपंचायत सदस्य व सरपंच असे एकूण १० सदस्य ग्रामपंचायतीचे असून ग्रामसेवक अनिता पाटील, सरपंच मानसी पाटील यांच्या उपस्थितीत ही निवडणूक संपन्न झाली. बोकडविरा गावचे सुपुत्र, ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते, गाव हक्क संघटना पॅनलचे उमेदवार शेखर भास्कर पाटील यांची बोकडविरा ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी निवड झाल्याने त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शेखर पाटील यांच्या चाहत्यांनी, मित्र वर्ग, नातेवाईकांनी त्यांना सोशल मीडिया द्वारे तर अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# राजिप शाळा कोंढरीच्या विद्यार्थीनींचे सुयश



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा परिषद शाळा कोंढरीच्या विद्यार्थीनी हेतल प्रवीण पांचाळ आणि तनिष्का चेतन पाटील या विद्यार्थीनींनी महाराष्ट्र राज्य इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परिक्षेत तसेच नुकत्याच पार पडलेल्या द्रोणागिरी स्पोर्ट्स आयोजित शालेय स्पर्धेत विशेष यश संपादन केले आहे.

कुमारी हेतल प्रवीण पांचाळ हिने पाचवी शिष्यवृत्ती परिक्षेत रायगड जिल्ह्यात विशेष प्रावीण्यसह ८७ वा क्रमांक आणि जिल्हास्तरीय द्रोणागिरी स्पोर्ट्स आयोजित निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तसेच कुमारी तनिष्का चेतन पाटील हिने शिष्यवृत्ती परिक्षेत विशेष यश संपादन करत रायगड जिल्ह्यात १७१ वा क्रमांक पटकावला आहे आणि जिल्हास्तरीय द्रोणागिरी स्पोर्ट्स युवा महोत्सव आयोजित तनिष्का पाटील हिने वक्तृत्व स्पर्धेत व्दितीय, हस्ताक्षर स्पर्धेत व्दितीय, निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

तरी या दोन्ही विद्यार्थीनींच्या यशाबद्दल सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना कोंढरी शाळेचे मुख्याध्यापक म.का.म्हात्रे, सहशिक्षिका प्रमिला गावंड, समता ठाकूर आदिंचे सहकार्य लाभले आहे. तसेच शिष्यवृत्ती परिक्षेसाठी मोलाचे मार्गदर्शन कोंढरी गावचे सुपुत्र राजिप शिक्षक रत्नाकर तुकाराम पाटील यांचे लाभले आहे.

# सैन्य दलात भरती झालेल्या बाबू नाईकचे उत्स्फूर्त स्वागत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हाद्दीतील दहिवली विभागातील संजय नगर मधील बाबू प्रेमानंद नाईक या युवक सैन्य दलात भरती झाला. त्याची नाशिक येथील ट्रेनिंग संपवून तो कर्जतमध्ये आला.बाबूला सर्व जण लखन या नावाने ओळखतात.



बाबूचे दहावी पर्यंतचे शिक्षण स्वातंत्रसैनिक दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतन मध्ये झाले तर वाणिज्य शाखेतील १२ पर्यंतचे शिक्षण अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात झाले.बाबू मूळ कर्नाटक राज्यातील परंतु गेल्या २० वर्षांपासून ते कर्जतमध्ये वास्तव्यात आहेत. बाबूचे वडील प्रेमानंद आणि आई इंदूबाई. बाबूला अगदी कळायला लागल्यापासूनच जवानांबद्दल आकर्षण होते. त्यामुळे आपण सैन्य दलात भरती व्हायचे असे त्याने मनोमन ठरविले होते आणि त्याला त्यासाठी आई - वडिलांचा पाठिंबा होता.

१२ वी उत्तीर्ण झाल्यावर बाबू सातारा येथील कमांडो अकादमीत सैनिकी शिक्षणासाठी दाखल झाला. सहा महिन्यांचे शिक्षण झाल्यावर तो मुंबईत येऊन सैन्य दलात भरती झाला. त्यांनतर त्याला ट्रेनिंगसाठी नाशिक येथील ऍडलरी सेंटर मध्ये पाठविण्यात आले. तेथील खडतर ट्रेनिंग त्याने सहजतेने पूर्ण केली आणि त्याची नियुक्ती पंजाब मधील पटीयाला येथे झाली. त्यानंतर तो कर्जत येथे आपल्या घरी आला. त्याचे कर्जतकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

# श्री मोरे माऊली संप्रदायाच्या दिनदर्शिका प्रकाशन सोहळा



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

श्रीमोरेमाऊली संप्रदायातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्याला एकाच व्यासपिठावर सर्वपक्षिय नेत्यांची उपस्थिती लाभली असता स्वपक्षियांना काचपिचक्या देताना अन्यपक्षियांच्या नेत्यांचे कौतुकही करण्याचा प्रकार पाहून उपस्थित संतजन अवाक झाले. महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी या दिनदर्शिकेचे प्रकाशन व लोकार्पण केले.

याप्रसंगी श्रीमोरेमाऊली संप्रदायाचे गुरूवर्य आनंददादा मोरे माऊली, आजरेकर फड कोकण विभागाचे गणपत मोराणकर महाराज, ह.भ.प.रामदादा घाडगे, लक्ष्मण महाराज मालुसरे, हभप हरिश्चंद्र महाराज मोरे, रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन हनुमंत जगताप, भाजपनेते मनोज भागवत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष निकम, अध्यक्ष अनंत पार्टे, कार्याध्यक्ष चंद्रकांत कळंबे आणि सचिव लक्ष्मण मोरे आदी व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी आ.भरत गोगावले यांनी, दरवर्षी आपल्या घराकडे १३ पायीवाऱ्यांचे आगमन होत असून भाग्यवान आमदार म्हणून नेहमीच जनतेची सेवा करण्याचे भाग्य आपणास मिळेल, असा आशावाद व्यक्त करताना श्रीसंत मोरे माऊली संप्रदायाचे काम पारमार्थिक क्षेत्रामध्ये कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले.

याप्रसंगी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, मोरे माऊली परिवाराच्या पारमार्थिक आठवणींना उजाळा दिला. पोलादपूर तालुक्यात पन्नास टक्क्यांहून अधिक वारकरी संप्रदायाची जनसंख्या असल्याने हा तालुका वारकरी तालुका असल्याचा अभिमान असल्याचे मत व्यक्त केले.

# ट्रेलरची एम्ब्यूलन्सला धडक; दोन जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव ट्रेलरची पुढे जाणाऱ्या एम्ब्यूलन्सला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एम्ब्यूलन्समधील दोघे जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील बारवई गावाच्या हद्दीत घडली आहे.

बारवई पोस्ट पोयंजे जुना पुणे हायवे रोडवरील चंद्रप्रकाश कहर (वय-४१) हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर क्र- एमएच ४८ एजी ४६६४ हा घेऊन भरधाव वेगाने जात असताना त्याने पुढे जाणाऱ्या एम्ब्यूलन्सला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एम्ब्यूलन्समधील साजिदा काझी (वय-३०) व जयश्री गवई (वय-३८) हे दोघे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक/आरटीएस अपिल क्र.०६/२०१७

१) श्री.किसन आंबो तांडेल
रा.पाले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१) श्रीम.निराबाई पांडुरंग तोडेकर
रा.कोपरगाव, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — उत्तरार्थी

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : पालेबुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं. / हिस्सा नं. १७१/४/५ क्षेत्र ०-४३-०० आकार २.९७ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.२१/११/२०१७ रोजी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.१२/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३१/१२/०२१

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी करिता**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल मिनाबाई गोपीनाथ ढमाले, रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड यांचे मालकीची मौजे : वडघर येथे बांधकाम क्र.एम.ओ.३२ हे निवासी घर होते. ते आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादीत झाल्याने आमचे अशिलांस सिडको लि.कडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तत्संबंधीत वापरामुळे बाधीत प्रकल्पग्रस्तांसाठी भूखंड वाटप बी नियम २०१५ चे अंतर्गत खालील वर्णनाचा भूखंड वाटप करण्यात आलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील नोड पुष्पक**
**सेक्टर आर-२, भूखंड क्रं.६० अ, क्षेत्र ८० चौ.मी.**

वर नमूद भूखंडास यापुढे या नोटीशीमध्ये 'सदर भूखंड' असे संबोधण्यात आलेले आहे.

सदर भूखंडातील भाडेपट्ट्याचे हक्क आमचे अशिलांस तिची सख्खी मुलगी अंजली उर्फ अंजनी हनुमान केणी हिस बक्षिसपत्राने हस्तांतरीत करण्याचे आहे.

तरी या नोटीशीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येत आहे की, सदर भूखंडातील भाडेपट्ट्याचे हक्काचे बक्षिसपत्र कोणाचीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत प्रथम दर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल कराव्यात. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमूद व्यक्तींच्या लाभांत बक्षिसपत्र करून देतील याची नोंद घ्यावी.

कळावे ही जाहीर नोटीस दिली.

दि.०७/०१/२०२२

**सही/-**
**सौ.जान्हवी निलेश गोगटे**
**१-१ए/ए/४, सृष्टी को.ऑप.**
**हौसिंग सोसायटी, पटेल पार्क,**
**परदेशी आळी, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८१९१४९५५८**

मे.पांडे साहेब

अर्जदार तर्फे वकील
ॲड.तुषार एल. सोंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे सो.न्यायालयात

क्रि.एम.ए.नं.०२/२०२२
ने.ता.०५/०२/२०२२

श्री.सागर रामचंद्र खुणे
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.युधिष्ठर सी.एच.एस., सेक्टर ०३, प्लॉट नं.०८,
फ्लॅट नं.बी ०६, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
पनवेल विभाग
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा अर्जदार यांची आजी कै.शहाबाई शिवराम खुणे यांचा मृत्यू दि.२६/१२/२०१० रोजी गांधी हॉस्पिटल पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. म्हणून अर्जदार श्री.सागर रामचंद्र खुणे, यांनी कै. शहाबाई शिवराम खुणे यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणे करिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.शहाबाई शिवराम खुणे यांचा वर नमूद ठिकाणी मृत्यू झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जााहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.७/०१/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल लक्ष्मीनगर दावडा इस्टेट सहकारी गृह निर्माण संस्था चे संचालक मंडळ, पत्ता : सर्व्हे नं.१६, हिस्सा नं.२ (२) बी, २ (३/१), २/७, विहिघर, ता.पनवेल, जि.रायगड हे खालील नमूद भूखंड

**गाव : विहिघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्रं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| १ | १६ | १६/२/२/ब | १८ गुंठे |
| २ | १६ | १६/२/३/१ | २ गुंठे |
| ३ | १६ | १६/२/३/२ | ५ गुंठे |
| ४ | १६ | १६/२/४ | १६ गुंठे |
| ५ | १६ | १६/२/६ | १७ गुंठे |
| ६ | १६ | १६/२/७ | ३२ गुंठे |

हा श्री.शैलेश जमनादास दावडा (विकासक) यांचेकडून लक्ष्मीनगर दावडा इस्टेट सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे अभिहस्तांतरण (कन्व्हेयन्स डिड) करण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणत्याही व्यक्तीचे, कंपनीचे, सहकारी संस्थेचे बँकेचे चॅरिटेबल ट्रस्ट तसेच सोसायटीचे कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहाण, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, ॲटेचमेंट इ. अगर अन्य प्रकारचे कसलेही हक्क अगर कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात त्यासंबंधी लेखी निवेदन अथवा हरकत कागदोपत्री पुराव्यासह द्यावी, अशी लेखी खबर अथवा हरकत सदर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०७/०१/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रिती बनकर**
**ऑफिस नं.ए ५, साई संगम,**
**सेक्टर १९, उलवे, नवी मुंबई**

राव साहेब

अर्जदारातर्फे ॲड.स्वप्नील बा. देशमुख

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८१५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०१/२०२२

१) श्रीम.गुलाब मधुकर कालेकर
वय : ६० वर्षे, धंदा : घरकाम
रा.टेपआळी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
२) श्री.महेश मधुकर कालेकर
वय : ४४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.टेपआळी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
३) श्री.रवींद्र मधुकर कालेकर
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.टेपआळी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
४) सौ.नीतू संतोष सुरेकर
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.२७०, थ्री टायर रोड जवळ,
कानसई गाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार श्रीम.गुलाब मधुकर कालेकर वगैरे ३ यांनी इंडियन सक्सेशन ॲक्ट कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी चौ.अर्ज क्र.१८१५/२०२१ दाखल केला आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार नं.१ यांचे पती तसेच अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.मधुकर शंकर कालेकर हे दि.३०/०५/२०२१ रोजी मौजे : नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत. त्यांचे नावे युनियन बँक ऑफ इंडिया शाखा नेरळ, ता.कर्जत येथे खाते क्र.३२०९०३०६००००५८० रक्कम रु.१०,००,०००/- आहे. तरी त्यांना अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशी वारस आहेत. इतर कोणीही वारस नाहीत, असे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांनी अर्ज केला आहे.

कै.मधुकर शंकर कालेकर यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणे गरजेचे आहे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांना वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित व इतर यांची काही हरकत असल्यास त्यांनी कागदपत्रांसह तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत दि.१९/०१/२०२२ पूर्वी या न्यायालयात दाखल करावी. जर मुदतीमध्ये कोणतीही हरकत किंवा तक्रार न आल्यास अर्जदारांना त्यांच्या विनंतीनुसार वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस आज दि.०५/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, पनवेल**

# संक्षिप्त...

## पत्रकारदिनी वनौषधी रोपांचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पत्रकारदिनाचे औचित्य साधून साप्ताहिक आर्या प्रहरच्या वतीने पनवेल, पालघर येथे वनौषधी रोपांचे वाटप करण्यात आले.

वनौषधी प्रेमींचे आवडते वृत्तपत्र असलेल्या आर्या प्रहारच्या अरुण पाटकर, मौसमी तटकरे, राजेश संखे, सुधीर पाटील, संतोष कोरे, अमेय पिंपळे, संजोग संखे, परेश संखे, मुकेश सिंह, सौ.उज्वला जगताप, जितेंद्र सावे आदींच्या हस्ते के.आ.बांठीया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळी, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह १०१ नागरिकांना पांढरे चित्रक, कडू चिरायता, कुडा, गुडमार, वैजयंता तुळस, अडुळसा आदी वनौषधी रोपे भेट दिली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे नागरिकांनी विशेष कौतुक केले आहे.

## दिलीप भागवत यांना मातृशोक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुका पंचायत समितीचे माजी सभापती दिलीप शरद भागवत यांच्या मातोश्री शैलजा शरद भागवत यांचे गुरूवार, दि. ६ जानेवारी २०२२ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. पोलादपूर शहरात सर्वत्र या दु:खद घटनेने हळहळ व्यक्त झाली.

पोलादपूर शहरातील तांबडभवन भागातील रहिवासींसोबत नाळ जुळलेल्या भागवत कुटूंबियांना सध्या चौपदरीकरणामुळे अन्यत्र स्थलांतरित व्हावे लागले असून याच कारणास्तव माजी सभापती दिलीप भागवत हे गेल्या काही वर्षांपासून प्रभातनगर पश्चिम भागामध्ये वास्तव्यास गेले आहेत. त्यांच्या मातोश्रींना गेल्या काही दिवसांपासून वृध्दापकाळामुळे प्रकृती अस्वास्थ्य वाटत होते. त्यामुळे त्यांच्यावर महाड येथील डॉ.म्हामूणकर यांच्याकडे उपचार सुरू असतानाच गुरूवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. श्रीमती शैलजा शरद भागवत यांच्या पश्चात दोन पुत्र, कन्या, जावई, नातवंडे, पंतवंडे असा मोठा परिवार असून पोलादपूर शहरातील तांबडभुवन येथील रहिवाशांनी समाजासोबत पुढाकार घेऊन या दु:खदप्रसंगी सावरण्यासाठी महत्वाची भुमिका पार पाडली. गुरूवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास पोलादपूर शहरातील वैकुंठभूमीमध्ये श्रीमती शैलजा भागवत यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# देवन्हावे ग्रुप ग्रामपंचायतीच्या पाणी योजनेसाठी शासन मंजुरी ; व्यवसायाला मिळणार बळ

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यातील देवन्हावे ग्रुप ग्राम पंचयत हद्दीतील देवन्हावे, दहिवली, सांगडेवाडी हा परिसर येत असून येथे थीम पार्क सह अन्य मनोरंजनसाठी येणारे पर्यटक यामुळे दरडोई जवळपास ३ हजार नागरिकांचा वावर असल्याने कार्यान्वित असणाऱ्या पाणी योजनेतून पाण्याची कमतरता भासत असल्याने येथील सरपंच अंकित साखरे यांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी खासदार सुनील तटकरे यांच्या कडून पाणी योजनेसाठी निधी मिळावा यासाठी पाठपुरावा केल्याने देवन्हावे ग्रुप ग्रामपंचायतीला ७ कोटी ११ लाख ५० हजार रुपये निधीला मान्यता मिळाली असल्याने लवकरात लवकर या योजनेच्या कामाला सुरुवात होईल व येथील पाणी प्रश्न मार्गी लागेल रायगड जिल्ह्यातील ही पहिली मोठी पाणी योजना होणार आहे. त्यामुळे महिला वर्गात



आनंदाचे वातावरण असून येथील हॉटेल व अन्य व्यवसायाला अधिक बळ मिळणार असल्याची माहिती देण्यात आली.

खालापूर तालुक्यातील देवन्हावे ग्रुप ग्रामपंचायत अष्टविनायका पैंकी एक असणाऱ्या बल्लाळेश्वराच्या गणपती देवस्थानाच्या मार्गावर पंचायत हद्दीत अंतर राष्ट्रीय ॲडलॅब थीम पार्क असल्याने या ठिकाणी सर्वाधिक नागरिकांचा वावर सुरू आहे. त्यामुळे या ठिकाणी जुनी पाणी योजना अपुरी पडणार असल्याचे लक्षात घेऊन देवन्हावे ग्रुप ग्रामपंचायतीच्या कार्यक्रमानिमित्त रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्याकडे नवीन पाणी पुरवठ्यासाठी निधीची मागणी केल्याने याबाबत पाठपुरावा करीत असताना रायगडच्या पालकमंत्री आदीती तटकरे, आ.अनिकेत तटकरे, माजी आमदार तथा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुरेश भाऊ लाड यांनी मोलाचे सहकार्य केल्याने देवन्हावे ग्रामपंचायतीच्या नवीन पाणी योजनेला ७ कोटी ११ लाख ५० हजार रुपये प्रशासकीय मंजुरी राज्य शासनाने दिली आहे. याबाबत पंचायतीला लेखी आदेश ही पाठविण्यात आले आहे. त्यामुळे नवीन पाणी योजनेमुळे येथील पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्यामुळे महिला वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

या पाणी योजनेतील पाणी प्रश्न ३० वर्ष कमतरता भासणार नाही अशी माहिती पंचायतीच्या वतीने साखरे यांनी दिली आहे. यावेळी सरपंच अंकित साखरे, उपसरपंच, संदेश चौधरी, सदस्य भगवान पाटील, ग्रामसेवक काळे, सामाजिक कार्यकर्ते संजय मामा कडव, भूषण कडव, श्रीकांत पाटील, संदेश पाटील, अविनाश पाटील, मनोहर बैसाणे, संजय पाटील, आदी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## २०२१ मध्ये पनवेल तालुक्यात सापडले १७८ कुष्टरुग्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कुष्ठरोग हा इतर रोगांपेक्षा थोडा वेगळा असला तरी लवकर निदान व योग्य उपाययोजना करून रोग बरा करणे शक्य आहे. यासाठी शासन स्तरावर उपाययोजना केल्या जात आहेत. २०२१ मध्ये पनवेल तालुक्यात १७८ कुष्टरुग्ण सापडले आहेत. यातील ९१ रुग्ण बरे झालेले असून ६४ रुग्णावर उपचार सुरू आहेत. २०२० मध्ये पनवेल तालुक्यात १८७ कुष्टरुग्ण सापडले होते.

कुष्ठरोग निर्मूलनाबाबत जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत गेल्यामुळे जनतेचा कुष्ठरोगी व्यक्तीकडे बघण्याच्या दृष्टिकोनात हळुहळू फरक पडत आहे. मात्र कुष्ठरोग हा रोग सर्वसामान्य आहे. समाजाने कुष्ठपीडित व्यक्तींना स्वीकारावे याबद्दलची मानसिकता बदलण्यास काही काळ जावा लागेल. कुष्ठरोग हा सावकाश पसरणारा जिवाणूजन्य आजार आहे. याचा परिणाम त्वचा, हातातील आणि पायातील परिघवर्ती चेता, नाकाची अंतत्वचा, घसा आणि डोळ्यावर होतो.


चेतांच्या टोकावर परिणाम झाल्याने परिणाम झालेल्या भागाची संवेदना नष्ट होते. संवेदना नाहिशी झाल्याने हाता पायाची बोटे वाकडी होतात किंवा गळून पडतात. त्वचेवर न खाजणारा व बधिर चट्टा आल्यास किंवा हातापायास मुंग्या, बधिरपणा आल्यास किंवा त्वचा लालसर चमकदार दिसू लागल्यास ताबडतोब तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करणे आवश्यक आहे. रोगाचे निदान झाले तरी घाबरण्याचे कारण नसते. यावर प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. त्यामुळे कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होतो.

## मुरुडमध्ये रेझिंग डे विविध कार्यक्रमांनी साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड पोलीस दल, मुरुड पोलीस ठाणे यांच्या माध्यमातून जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या प्रमख मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन गवारे मान्यवरांच्या उपस्थितीत समुद्रकिनारी व पुरकरनाका येथे रेझिंग डे निमित्त प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग येथील कलाकारांनी ऑन ड्युटी चोवीस तास या पथनाट्यातून पोलीस विभागाच्या कार्याची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच पोलीस काका, पोलीस दीदी, ११२ क्एड्झ लाईन, पोलीस मित्र याविषयी जनतेला माहिती व्हावी. सायबर क्राईम होऊ नये यासाठी कोणती दक्षता घ्यावी याविषयी देखील जनजागृती करण्यात आली.

सदर पथनाट्याचे नेतृत्व राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तथा प्रिझम



सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी या करीत असून सदर पथनाट्यामधील कलाकार म्हणून विनोद नाईक, अमृता शेडगे, प्रसाद अमृते, सागर पाटील, तुषार राऊळ, कुणाल घुले, निशिता पाटील, मानसी पाटील, मानसी पोसरेकर आदी. कलाकार सहभागी झाले होते.

यावेळी कोविड-१९,ओमिक्रॉन फार झपाट्याने वाढत आहे यासाठी सर्वांनी मास्क लावा, सामजिक अंतर पाळा, वारंवार आपले हात साबणाने स्वच्छ धुवा, ज्यांचे वॅक्सिंन राहिले असेल त्यानी वॅक्सिंन करुन घ्या आणि आपल्याला व आपल्या कुटुंबियांना सुरक्षित ठेवा, आपल्याला कोविडची कोणतीही लक्षणे आढळल्यास त्वरित नजिकच्या आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधा. असे आवाहन रायगड जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस दल यांच्या वतीने प्रिझमच्या कलाकारांनी केले.

## सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील रोटरी इंग्लिश मिडीयम हायस्कूल आणि ज्यु. कॉलेज सायन्स व कॉमर्स यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला सक्षमीकरण या कार्यक्रमा अंतर्गत वेशभूषा स्पर्धा, एकांकिका व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर एक लघुनाटिका हे सर्व कार्यक्रम सादर करण्यात आले.

उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सायली म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच शाळेचे अध्यक्ष शेखर म्हात्रे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन केले. रोटरी शाळेच्या PTA उपाध्यक्षा अर्चना सावंत, पालक शिक्षक संघटनेचे महिला सदस्य तसेच शाळेच्या ॲडमिन ऑफिसर पुष्पा कुरूप, प्राचार्य अक्षता घरत, मुख्याध्यापिका संजीता थळी व शिक्षक उपस्थित होते व त्यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## पत्रकार दिनानिमित्त सुधागड तालुका प्रशासन व पोलीस प्रशासनातर्फे तहसील कार्यालयात तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पत्रकार दिनानिमित्त पाली तहसील कार्यालयात सुधागड तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी तहसिलदार दिलीप रायण्णावार, गटविकास अधिकारी विजय यादव, पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे व नायब तहसीलदार दिलीप कोष्टी यांनी सर्व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या व त्यांना सन्मानित केले. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून तिसरा डोळा आहे. असे तहसिलदार दिलीप रायण्णावार यावेळी म्हणाले. तर पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे म्हणाले की डिजिटल माध्यमाच्या युगात आजही पत्रकारिता प्रभावी ठरत आहेत. पत्रकार आपल्या लेखणीतून अनेक परिवर्तन घडवून आणतात. तर गटविकास अधिकारी विजय यादव म्हणाले की लोकांचे प्रश्न मांडण्याचे प्रशासनाच्या कामावर लक्ष ठेवण्याचे महत्वाचे काम पत्रकार करतात. जेष्ठ पत्रकार रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी समाजातील पत्रकारांचे महत्व स्पष्ट केले.

तसेच पत्रकार फक्त बातमी देऊन थांबत नाहीत तर त्या बातमीचा पाठपुरावा करून प्रश्न सोडवितात. एखादी समस्या मार्गी लावण्यासाठी वेळप्रसंगी चळवळी व आंदोलने देखील करतात. असे देखील ओव्हाळ म्हणाले.

यावेळी जेष्ठ पत्रकार रवींद्रनाथ ओव्हाळ, अमित गवळे,सुधागड प्रेस क्लबचे अध्यक्ष विनोद भोईर, जेष्ठ पत्रकार दत्तात्रेय दळवी, मंगेश यादव, अमित गायकवाड, संदेश उतेकर, प्रशांत हिंगणे व चेतन वळंज आदी पत्रकार उपस्थित होते.

## म्हसळा तालुक्यामध्ये शिक्षक संघ वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

अखिल म्हसळा तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने कन्या शाळा येथे शिक्षक संघ वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष श्री सुनिल पवार हे होते तर प्रमुख मान्यवर म्हसळा पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी माननीय राजेश कदम जिल्हा संघाचे कार्याध्यक्ष किशोर मोहिते, उपाध्यक्षा गीतांजली भाटकर हिशोब तपासणीस कैलास कळस, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अनंत येलवे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अरुण माळी, तालुका कार्याध्यक्ष रमेश जाधव, सरचिटणीस प्रकाश मांडवकर, विजय घाटगे, सुमित्रा खेडेकर, समीर पाष्टे उपस्थित होते.

सुरुवातीला कै. सिंधुताई सकपाळ यांना श्रद्धांजली वाहण्यात आली तद्नंतर शिक्षकांचे पंचप्राण दादासाहेब दोंदे , शिक्षक नायक अरुण भाई दोंदे, शिक्षक नेत्या सुलभाताई दोंदे, पहिल्या महिला शिक्षीका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर प्रास्ताविक सौ शुभदा दातार यांनी केले यामध्ये संघटनेचे वर्धापन दिनाचे महत्त्व पटवून दिले तसेच संघटनेची कार्य पद्धती संघटना शिक्षकांच्या हक्कासाठी लढत असताना आपले कर्तव्य विसरत नाही हे स्पष्ट केले.

अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महिलांसाठी रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते यातील विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक- भाग्यश्री विपुल चक्करवार, द्वितीय क्रमांक- श्रेया मंगेश कदम, तृतीय क्रमांक- इंदिरा गंगाधर चौधरी, उत्तेजनार्थ बक्षीस -सौआरती अशोक राठोड व सौ ज्योती महादेव पवार यांना देण्यात आला यानंतर सावित्रीबाई फुले व जिजाबाई यांच्या जयंती पंधरवडा निमित्ताने महिला शिक्षिकांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी राजेश कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संघटनेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले या संघटनेच्या माध्यमातून असेच चांगले कार्य घडत राहो अशी अपेक्षा व्यक्त केली त्याच प्रमाणे कोविड काळामध्ये शाळा बंद असल्या तरी सुद्धा आपण स्थानिक पातळीवर पालकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे अध्यापन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली त्याच प्रमाणे आपले पंचायत समिती मध्ये काही प्रलंबित प्रश्न आहेत यासाठी आपण सर्वांनी मिळून ते सोडवण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले.

जिल्हा संघाचे कार्याध्यक्ष किशोर मोहिते यांनी आपल्या मनोगतामध्ये संघटनेचा इतिहास सांगत असताना ही संघटना ७ जानेवारी १९५४ रोजी दादासाहेब दोंदे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे उपस्थितीमध्ये पहिले अधिवेशन झाले याची माहिती देऊन संघटना ही जागतिक पातळीवर ती असून आपले शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यरत असतेच याबरोबर गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम, प्रशिक्षण घेत असते.१९६४ ला संघटनेने ५४ दिवसाचे शाळा बंद आंदोलन केले यावेळी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ दिले नाही त्याचप्रमाणे आता कोवीड काळामध्ये आपण देखील हीच भूमिका घ्यायची आहे त्याप्रमाणे आपले तालुका, जिल्हा पातळीवरील जे प्रलंबित प्रश्न असतील ते संघटनेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

संघटनेचे माजी सल्लागार अनंत येलवे, अरुण माळी, गीतांजली भाटकर ,कैलास कळस, प्रकाश मांडवकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षक संघ वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनिल पवार यांनी आपल्या मनोगतामध्ये संघटने मध्ये काम करत असताना संघटनेवर आपली निष्ठा असणे महत्त्वाचे आहे संघटनेने आपल्याला काय दिले यापेक्षा आपण संघटनेसाठी काय केले याचा विचार आपण केला पाहिजे.आपण संघटना वाढीसाठी सर्वांनी एकोप्याने राहिले पाहिजे. मी नोकरीला लागल्यापासून आजपर्यंत याच एका संघटनेचा सभासद राहिलो असून २८ फेब्रुवारीला सेवानिवृत्त होत आहे तरी आतापर्यंत मला सर्वांनी सहकार्य केले याबद्दल सर्वांचे आभार मानले यानंतर देखील मी ७ जानेवारी च्या कार्यक्रमाला येत राहील असे सांगितले शिक्षकांनी आपले प्रश्न संघटना पदाधिकाऱ्यां पर्यंत पोहोचवले तर त्याची सोडवणूक नक्कीच होईल असे स्पष्ट केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगीता शिरणे, संगिता आंबेडकर, सोनाबाई शिंदे, भानुदास राठोड, शिवाजी चव्हाण, नागेश शेवडीकर, प्रविण सोनवणे,गौतम बागलानी, विपुल चक्करवार, यांनी सहकार्य केले. शेवटी भानुदास राठोड यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

### चिंचपाडा गावातील रिक्षा चालकाचा प्रामाणिकपणा

## सोन्याचे मंगळसूत्र केले पोलीस ठाण्यात जमा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चिंचपाडा गावात राहणाऱ्या एका रिक्षाचालकाने महिलेची प्रवासादरम्यान रिक्षामध्ये पडलेले सोन्याचे मंगळसूत्र पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुरुवारी ता. ६ रोजी जमा करून प्रामाणिकपणाची प्रचीती दिली आहे. मात्र कुठल्या महिलेचे मंगळसूत्र रिक्षामध्ये हरविले असल्यास त्या महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

पनवेल तालुक्यातील चिंचपाडा गावातील रहिवासी व आता स्थलांतरित झालेल्या पुष्पक नोड वडघर येथे राहणारे मंगेश लहू भिंगारकर असे या प्रामाणिक रिक्षाचालकाचे नाव असून रिक्षा नंबर MH 46 -C 3297 अशी रिक्षा मंगेश हे चालवत आहे. त्याचबरोबर मंगेश हे श्री स्वामी नरेंद्र महाराज यांचे साधक आहेत. मंगेश यांच्या रिक्षामधून प्रवासीला



सोडल्यानंतर रिक्षामध्ये पडलेले अज्ञात महिलेचे मंगळसूत्र परत करत अनेक मुजोरी करणाऱ्या रिक्षा चालकांना चांगल्या कामाची प्रचीती करून दिली आहे. हि घटना चार दिवसापूर्वी घडली आहे. मंगेश हे आपल्या रिक्षामधून पनवेल रेल्वे स्थानक ते करंजाडे वसाहत, पुन्हा करंजाडे वसाहत ते रेल्वे स्थानक अश्या फेरीमध्ये रिक्षा चालवीत आहेत. यावेळी गेल्या चार दिवसापूर्वी दिवसभर अश्या अनेक फेऱ्या मारीत प्रवाश्याना ने-आण केली. यावेळी सायंकाळी मंगेश घरी आपल्यानंतर रिक्षामध्ये सोन्याचे मंगळसूत्र पडलेले दिसले. त्याने ती वस्तू घेत प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष नरेश परदेशी यांची भेट घेत याबाबत माहिती दिली. अखेर गुरुवारी यांनी पनवेल शहर गाठत याबाबतची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, पोलीस निरीक्षक गुन्हे संजय जोशी यांना दिली. व हे सोन्याचे मंगळसूत्र पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेट्टे यांच्याकडे जमा केले. पोलिसांनी या प्रामाणिक रिक्षाचालकाचे कौतुक केले. हे मंगळसूत्र ज्या महिलेचे असल्यास त्या महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पुन्हा थंडीचा कडाका वाढू लागला ; उबदार कपड्यांना वाढू लागली मागणी

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

आठ दिवस गायब झालेली थंडी दोन दिवसांपासून पुन्हा सुरू झाल्याने थंडीचा वाढता कडाका पाहता उबदार कपड्यांनाही मागणी वाढू लागली आहे.

मागील आठ दिवसांपूर्वी प्रचंड धुके,दवबिंदूंची बरसात व अक्षरक्ष: हुडहुडा भरणारी थंडी याचा अनुभव सा-यांनीच घेतला.त्या कडाक्याच्या थंडीत सकाळी अकरा वाजेपर्यंत धुकेही हटत नव्हते.त्यामुळे वातावरणातील गारवा दिवसभर टिकून राहायचा तर पुन्हा संध्याकाळी पाच वाजताच पुन्हा वातावरणात गारवा पसरला जायचा.आठ दिवसांपूर्वी प्रत्येकाने अनुभवलेली कडाक्याची थंडी काही काळ गायबच झाली होती. तर पुन्हा दोन दिवसांपासून वातावरणात पुन्हा थंडीचा कडाका वाढू लागल्याने व सकाळी उशिरापर्यंत धुके टिकून राहत असल्याने जनजीवनावर त्याचा परिणाम होऊन जनजीवनही विस्कळीत झाले आहे.

थंडीचा वाढता कडाका पाहता याचा सर्वात जास्त प्रभाव लहान मुले व वयोव्रुद्ध मंडळींना जाणवत असल्याने त्यांना थंडीचा त्रासाचा सामना करावा लागत आहे.वाढत्या थंडीचा त्रास होऊ नये व आपल्याला त्रास होऊ नये यासाठी ऊबदार कपडे वापरावे,अति थंड पदार्थ व पाणी तसेच कोल्ड्रिंक्स याचे सेवन करू नये. तर थंडीचा त्रास जाणवून सर्दी, पडसे,खोकला किंवा ताप जाणवू लागल्यास त्वरीत आपल्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. अशाप्रकारचे थंडीच्या दिवसात काळजी कशी घ्यावी याबाबत खांब येथील सुप्रसिद्ध डॉ.महेंद्र म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे.